# सोनेरी वार्तापत्र

पुणे,मुंबई,अहिल्यानगर,नाशिकसह महाराष्ट्रातून प्रसिद्ध

मुख्य संपादक - संजोक काळदंते

शुक्रवार दिनांक १ ऑगस्ट २०२५

kaldantesanjok25@gmail.com

REG NO.: MAHMAR36520/13/01/2010-TC
DECL NO.: SDM/JUNNAR/SR/2/2010


# क्विक हिल फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने बी.जे.महाविद्यालयातील विद्यार्थी करत आहेत सायबर जनजागृती



**ओतूर,दि.१ प्रतिनिधी**

क्विक हिल फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने बी.जे.महाविद्यालयातील विद्यार्थी सायबर जनजागृती करत आहेत

श्री गाडगे महाराज विद्यालय ओतूर (ता.जुन्नर,जिल्हा) येथे सायबर सुरक्षिततेवर माहितीपर व्याख्यान संपन्न झाले असल्याची माहिती गाडगे महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी दिली

बी.जे.महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राबवित असलेल्या "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" या प्रकल्पांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी,सोयब शेख,मोहिनी जगताप,प्रतीक यादव,साहिल फापाळे,दिक्षा सस्ते,आकांक्षा कोकाटे,फरीन हवलदार,बुशरा पटेल यांनी श्री गाडगे महाराज विद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा व माहिती तंत्रज्ञान युगात इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी या विषयी माहिती देऊन सायबर जगतात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक बाबींची ओळख करून दिली.

सदर विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईलचा वापर व इंटरनेटचा वापर करताना काय काळजी घेतली पाहिजे हे उदाहरणासह समजून सांगितले.

या विद्यार्थ्यांच्या कामाचे मुख्याध्यापक संपत माने व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी कौतुक केले व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.